REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ५ जानेवारी, १९४९ | अंक १

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१२,७६०
खेळतें भांडवल रु. ७०,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

(मेहेरबान कलेक्टर पुणें जावक क्र. LND. SR. VI 200 दिनांक १८ नोव्हेंबर १९४८ द्वारें सरकारी मान्यता मिळालेलें )
सुभाष नगर
वसाहतींतील प्लॉटस् विक्री जोरांत चालूं आहे.
★ क्षेत्रफळ ५००० पासून ८५८० स्क्वे. फूट पर्यंत
★ लीज नसून संपूर्ण मालकी हक्क
★ पुणें स्टेशनपासून ३॥ मैलांवरच
★ किंमत १००० पासून १७१० रुपयांपर्यंत
★ पुणें आळंदी रस्त्यावर
★ प्लॉटस् थोडे शिल्लक असल्यानें निराशा टाळण्यासाठीं ग्राहकांनीं त्वरा करावी.
अधिक माहितीसाठीं लिहा अगर भेटा—
जी. टी. गोडबोले, बी. ए., एलएल. बी.
फॉर सुभाष हौसिंग सोसायटी ( रजिस्टर्ड ) ८१३, रविवार पेठ, सतरंजीवाला चौक, लोणार आळी, पुणें २.
घरचा पत्ता:— ९१ शुक्रवार पेठ, धोंडूमामा साठे वाडा, पुणें २.
भेटण्याची वेळ:—सकाळीं ८ ते ११॥ सायंकाळीं ६ ते ८॥

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
बुधवार चौक, पुणें

—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**नवीन ध्वनिक्षेपण केंद्रें**—हिंदुस्थान सरकारनें देशांतील ध्वनिक्षेपणाचीं केंद्रें वाढविण्याची एक योजना मुक्रर केली आहे. ह्या योजनेस अनुसरून अहमदाबाद, कालिकत, हुबळी आणि धारवाड ह्या चार ठिकाणीं येत्या फेब्रुआरी अथवा मार्च महिन्यापासून नवीन केंद्रें चालू करण्यांत येणार आहेत असें समजतें. म्हैसूरमधील सध्यांचें केंद्र बंगलोरला हलविण्यांत येणार आहे. बंगलोर हें सर्व कर्नाटकाच्या अधिक मध्यावर पडतें. केंद्र बंगलोरला आल्यावर त्यावरील कार्यक्रम अ. भा. रेडिओकडे येणार आहे.

**स्वस्त रेडिओ करण्याची खटपट**—हिंदुस्थान सरकारचे माहिती खात्याचे मंत्री श्री. दिवाकर ह्यांनीं, रेडिओ तयार करणाऱ्या धंदेवाइकांना एकत्र आणून खेडुतांना घेतां येईल इतका स्वस्त रेडिओ तयार करण्याची खटपट चालविली आहे. असे स्वस्त रेडिओ तयार होऊं शकले नाहींत तर त्याचा देशांतील लक्षावधि लोकांना मुळींच उपयोग होऊं शकणार नाहीं, असें त्यांचें मत आहे.

**हिंदची काश्मीरला मदत**—डिसेंबर महिन्यासाठी म्हणून हिंदुस्थान सरकारनें काश्मीर आणि जम्मूला २,५०० कापडाच्या गाठी देण्याचें कबूल केलें आहे. त्याशिवाय जम्मूमधील लोकांना अन्नधान्यांचा पुरवठा म्हणून ५६,००० मण गहूंही देण्याचें ठरविलें आहे.

**शाळेंतील मुलांना फराळ**—मुंबई प्रांतांतील शाळांतून मुलांना दुपारचा फराळ देण्याच्या एका योजनेचा मुंबई सरकार सध्या विचार करीत आहे असें समजतें. ही योजना अमलांत आणण्यासाठी सरकारला १० लाख रुपये अधिक खर्च येईल असा अंदाज आहे.

**कागदावर ध्वनिमुद्रण**—पोलंडमधील दोन संशोधकांनीं कागदावर ध्वनिमुद्रण करण्याचा शोध लावला आहे असें समजतें. सध्यांच्या ग्रामोफोनच्या तबकडीऐवजीं ह्या कागदी तबकड्यांचा उपयोग करण्यांत येऊं लागला तर त्यांच्या उत्पादनाच्या खर्चांत २० टक्के बचत होईल. शिवाय, त्या जवळजवळ कायम टिकणाऱ्या अशा होतील, असें वरील संशोधकांचें मत आहे.

**साखरेच्या उत्पादनाचा अंदाज**—हिंदुस्थान सरकारच्या शेतकी खात्यातर्फे १९४८–४९ मधील उंसाच्या लागवडीच्या क्षेत्राचा प्राथमिक अंदाज प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अंदाजांत हैद्राबाद संस्थानहि जमेस धरलें आहे. अंदाजाप्रमाणें चालू सालीं उंसाची लावगड ३६,१६,००० एकरांत करण्यांत आली आहे. १९४७–४८ सालीं ३४,३६,००० एकरांत करण्यांत आली होती. ह्यावरून चालू सालीं लावगडींत ४·३ टक्के वाढ झाल्याचें दिसून येत आहे.

**स्टॅलिनचीं ६९ वर्षें पुरीं झालीं**—मार्शल स्टॅलिन ह्यांच्या वयाला डिसेंबर २१ रोजीं ६९ वर्षें पुरीं झालीं. त्यांच्या वाढदिवसानिमित्त युगोस्लाव्हिआचे पंतप्रधान मार्शल टिटो ह्यांनीं पहिल्या प्रथम अभिनंदनाचा संदेश धाडला. पूर्व-युरोपांतील कम्युनिस्ट पक्षाची कॉमिन्फॉर्म नामक जी संघटना आहे तीमधून युगोस्लाव्हिआला काढून टाकण्यांत आल्याचें प्रसिद्धच आहे.

**सुटी घेण्याच्या पद्धतींत बदल**—मुंबईमधील कारखान्यांना व गिरण्यांना सध्या विजेचा पुरवठा अपुरा आहे. होणारा पुरवठा कामीं लावण्याच्या दृष्टीनें टाटा विज कंपनीनें कामगारांना द्यावयाच्या साप्ताहिक सुटींत बदल सुचविला आहे. हा बदल गिरणी-मालकांनाही मान्य आहे. ह्या सूचनेप्रमाणें सर्व कामगारांना एकाच दिवशीं सुटी न देतां दररोज ⅙ कामगारांना सुटी देण्यांत येईल. त्यामुळें मुंबईतील ⅚ कारखाने रोज काम करूं शकतील. हल्लीं सर्व कारखाने आठवड्यांत सहाहि दिवस अंशतः चालू राहूं शकतात.

**सिनेमाच्या पुस्तिकांची छपाई**—१९४५ च्या कागद-नियंत्रणाच्या हुकमाप्रमाणें बोलपटांचे निर्माते अगर थिएटरवाले ह्यांच्याशिवाय सिनेमाविषयक पुस्तिका छापणें अगर त्यांचा प्रसार करणें हा गुन्हा आहे. हा गुन्हा करणाऱ्यांबद्दल सरकार कडक धोरण स्वीकारील असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

**साखरेच्या धंद्याला संरक्षण**—मुंबईला टॅरिफ बोर्डाची बैठक नुकतीच भरली होती. ह्या बैठकींत सर्वसाधारणपणें असें मत व्यक्त करण्यांत आलें कीं, साखरेच्या धंद्याला असणारें संरक्षण आणखी दोन वर्षें चालू ठेवण्यांत यावें. दरम्यान साखरेच्या चालू उत्पादनाची किंमत आणि धंद्याचे व्यवहार ह्यांबाबत तपशीलवार चौकशी करण्यांत यावी. संरक्षण सध्या आहे तितकेंच देण्यांत यावें किंवा त्यांत कांहीं बदल करावा, ह्याबद्दल मात्र मतभेद व्यक्त करण्यांत आला.

**कराड अर्बन बँकेनें ठेवीदारांस दिलेली संधी**—कराड अर्बन को. बँकेनें रेशनिंग कापड व स्वस्त धान्याचें दुकान चालविण्यासाठी आवश्यक तें भांडवल ठेवींचे रूपानें उभारण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी सोमवार, तां. १० जानेवारी १९४९ ह्या एकाच दिवशीं सकाळीं ११॥ ते दुपारीं ४ पर्यंत एक वर्ष मुदतीच्या ठेवी द. सा. द. शे. ३॥ टक्के व्याजानें बँक स्वीकारील.

**सहकारी अधिकाऱ्याचा सन्मान**—श्री. के. आर. कुळकर्णी, एम. ए., चीफ ऑडिटर व फायनॅन्शिअल ॲडव्हायसर, को–ऑप. खातें, मुंबई इलाखा, पुणें, हे सरकारी नोकरींतून सेवानिवृत्त होत आहेत. त्या प्रसंगीं त्यांचा सन्मान करण्याकरितां एक अनौपचारिक सभा गुरुवार ता. ६ जानेवारी १९४९ रोजीं सायंकाळीं ६–३० वाजतां पुणें पोस्टल को. बँकेचे सभागृहांत भरविण्यांत येणार आहे.


दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., ( सातारा )
पुणें शाखा

नोटीस

सदर शाखेची, १७९ बुधवार लक्ष्मी रोड येथील चालू ऑफीसची जागा कामाला अपुरी पडत असलेनें तारीख १४।१।४९ ला मकर संक्रांती दिवशीं ३२५ बुधवार ढमढेरे बोळांत श्रीकृष्ण टॉकीज समोर भालेराव बिल्डिंगमध्यें नेण्यांत येणार आहे. बँकेचे हितचिंतकांनीं व खातेदारांनीं सदर तारखेपासून कामकाजासाठी नवीन पत्त्यावर यावें अशी विनंति आहे. ता. ३।१।४९

कामाची वेळ:
१०॥ ते २॥
शनिवार १०॥ ते १

मॅनेजर, पुणें शाखा

# अर्थ

बुधवार, ता. ५ जानेवारी, १९४९



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## हिंदी विमा व्यवसाय

### प्रतिकूल आर्थिक परिस्थितीचा आघात

हिंदी आयुर्विमा कंपन्यांना १९४७ साल जरा अवघडच गेलें. युद्धकालीन चलती ओसरून व्यवसायास साधारणपणें ओहोटीच लागली आणि त्यांचेपुढे नवे बिकट प्रश्न उभे राहिले. खर्चाच्या सर्व बाजू फुगत गेल्या व विमे रद्द होण्याचें मोठें प्रमाण कायमच राहिलें. विम्याचे हप्ते वाढले आहेत, ते विमा व्यवसायाच्या वाढीस बाधक होतील, असें मत कित्येक ठिकाणीं प्रकट करण्यांत येतें. त्यास उत्तर म्हणून सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स आपल्या १९४७ च्या अहवालांत म्हणतात, “ हयाती नंतरच्या विम्यांचे बाबतींत हप्त्यांत ३ ते २० % वाढ झालेली आहे आणि हयातींतील विम्यांचे बाबतींत ती सुमारें ४ ते ११% आहे. रहाणीस आवश्यक अशा इतर जिनसांच्या किंमतीमधील वाढीशी वरील वाढीशीं तुलना केली तर हप्त्यांमधील वाढ गैरवाजवी आहे, असें म्हणतां येणार नाहीं. ” सुपरिंटेंडेंटची ही विचारसरणी कितपत पटण्याजोगी आहे ? बहुसंख्य लोक विमा पॉलिसी विकत घेतात, त्याची तुलना बाजारांतील इतर जिनसांशीं करणें चुकीचें आहे. अनपेक्षित मृत्यूपासून आर्थिक संरक्षण करण्याच्या हेतूपेक्षा बचतीचा एक मार्ग ह्या दृष्टीनेंच लोक विमा पॉलिसीकडे पहातात आणि ह्या बचतीवर काय व्याज सुटतें, हा प्रश्न त्यांचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा असतो, ही गोष्ट दृष्टीआड करून भागणार नाहीं. जीवनावश्यक इतर जिनसा महागल्या कारणानें, विम्याच्या हप्त्यासाठीं पैसा बाजूस काढणें कठीण होत चाललें आहे. त्याचप्रमाणें, पंधरा-वीस वर्षांनंतर काय परिस्थिति राहील, ह्याची अनिश्चितता वाटत असल्यामुळें, तेव्हां मिळावयाच्या रकमेसाठीं आज त्याग करण्यास मनुष्याची प्रवृत्ति सहजी होत नाहीं. ह्या सर्व अडचणी विमा व्यवसायाच्या वाढीचे मार्गांत आहेत.

१९४७ सालीं हिंदी आयुर्विमा कंपन्यांना त्यांच्या लाइफ फंडावर, मुळांत इनकम टॅक्स कापून ३·०३% व्याज पडलें. १९४६ सालीं ३·२०% व्याज पडलें होतें. व्यवस्थेचा खर्च, म्हणजे हप्त्यांच्या वार्षिक उत्पन्नाशीं खर्चाचें प्रमाण, ३०·४% झाला. १९४६ सालीं हें प्रमाण ३१·२% होतें. म्हणजे, ज्या मानानें व्याजाचें उत्पन्न घटलें त्या मानानें खर्चाचें प्रमाण मुळींच उतरलेलें नाहीं. १९४७ च्या विमा वार्षिकांत ४९ कंपन्यांच्या मूल्यमापनाचे अहवाल दिलेले आहेत, त्यांपैकीं ३१ अहवाल वाढावा दर्शवितात. ह्या ३१ पैकीं १६ कंपन्यांनीं विमेदार आणि भागीदार ह्यांना वाढाव्याचा कांहीं भाग वाटला आणि बाकीच्या १५ कंपन्यांनीं वाढाव्याची रक्कम तशीच पुढें ओढली. १८ कंपन्यांनीं तूट दाखविली. त्यापैकीं १० कंपन्यांची तूट त्यांच्या वसूल भांडवलापेक्षां कमी होती आणि बाकीच्या ८ कंपन्यांची ज्यास्त होती. ३१ डिसेंबर १९४७ रोजीं, विमा कायद्याप्रमाणें आयुर्विमा कंपन्यांनीं सरकारी व तत्सम रोख्यांत आपली ५५% जिंदगी गुंतविण्यास हवी होती. परंतु त्यांनीं ८३% जिंदगी तशी गुंतविलेली आढळते. इतरत्र सुरक्षित पैसा गुंतविण्याची कंपन्यांना भासणारी अडचण ह्यावरून स्पष्ट दिसते.

१९४८ सालाबाबतचे विमा व्यवसायाचे अधिकृत आकडे मिळण्यास अद्याप एक वर्ष लागेल. तथापि १९४८ साल १९४७ चे मानानें अधिकच कठीण गेलें, असाच व्यक्तिगत कंपन्यांचा अनुभव आहे. आर्थिक परिस्थिति ज्यास्तच बिकट झाली. व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे क्षेत्रांत अनिश्चितपणाचें वातावरण होतें, महागाईहि वाढली. विमा कायद्यांत दीर्घ काळ होऊं घातलेल्या दुरुस्त्यांचा प्रत्यक्ष कायद्यांत अंतर्भाव आतां लवकरच होईल, असा रंग दिसतो. त्रैवार्षिक मूल्यमापन, सहकारी रोख्यांतील सक्तीच्या गुंतवणुकीच्या प्रमाणांत थोडी सवलत, स्टॅच्यूटरी कंट्रोल बोर्डाची स्थापना, इत्यादि दुरुस्त्या व सुधारणा आतां लवकरच होतील. एम्प्लॉईज स्टेट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची स्थापना, ही १९४८ मधील एक महत्त्वाची घटना आहे. कारखान्यांतील कामगारांची आजारीपण, बाळंतपण, अपघात इत्यादींची आर्थिक तरतूद करणें हा प्रस्तुत योजनेचा उद्देश आहे. अजमीर-मेरवाडा येथें ती प्रथम सुरू केली जाईल. मद्रास प्रांतांतहि बरेचसें प्राथमिक कार्य चालू आहे. पाकिस्तानांत हिंदी कंपन्यांचें जेवढें काम चालू आहे, त्या मानानें पाकिस्तानी कंपन्यांचें काम येथें नाहीं. त्यामुळें हिंदी कंपन्यांच्या तेथील जिंदगीच्या भवितव्याबद्दल चिंता निर्माण झाली आहे.

---

### तंत्रज्ञांची बेकारी टाळतां येणार नाहीं काय ?

हिंदुस्थानच्या औद्योगिक विकासासाठीं यंत्रविद्येचें तांत्रिक शिक्षण घेतलेल्या लोकांची फार आवश्यकता आहे. खाजगीरित्या परदेशीं जाऊन असें शिक्षण घेऊन येणारे लोक जसे आहेत त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकारनेंही स्वतःच्या खर्चानें असे तरूण शिक्षण देऊन आणले आहेत. तथापि दुःखाची गोष्ट अशी कीं ह्या तंत्रज्ञांना हिंदी उद्योगधंद्यांत सहज नोकऱ्या मिळूं शकत नाहींत. हिंदी सरकारचे उद्योग व पुरवठा मंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी ह्यांनीं ह्या चमत्कारिक पण उद्वेगजनक परिस्थितीकडे नुकतेंच लक्ष वेधलें. कलकत्ता येथील इंडियन केमिकल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनपुढें भाषण करतांना त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, परदेशाहून शिकून आलेले कांहीं यांत्रिक तज्ज्ञ सध्यां नोकरी मिळविण्यासाठीं वणवण हिंडत आहेत. ह्या तंत्रज्ञांना उद्योगपतींनीं नोकरीच्या ज्या अटी, पगार इत्यादि सांगितल्या त्या देशांतल्या देशांतच काम करून तयार झालेल्या कुशल कामगारांनीं सुद्धां पत्करण्यासारख्या नाहींत. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून नोकरी मिळण्याची खात्री असेल तरच ह्यापुढें सरकारतर्फे विद्यार्थ्यांना परदेशीं पाठविलें जाईल, असा खुलासा डॉ. श्यामाप्रसाद ह्यांनीं केला आहे. उद्योगपतींची ह्याबाबतची बाजू अशी आहे कीं, परदेशीं शिक्षण घेऊन आलेले तंत्रज्ञ त्यांना धंद्याच्या दृष्टीनें उपयोगी पडण्यासारखे नाहींत. उद्योगपतींचें हें म्हणणें खरें असेल तर, सरकार आणि उद्योगपती ह्यांनीं एकमेकांशीं विचारविनिमय करून आणि जरूर त्याच प्रकारच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. एरवीं, सरकारचा पैसा व विद्यार्थ्यांचे श्रम वाया जाऊन हिंदी उद्योग-धंद्यांची एक निकडीची गरज भागविली जाणार नाहीं ती नाहींच.

## आर्थिक परिस्थितीचें निरीक्षण

**( भा. म. काळे )**

१९४८ साल पुरें झालें आहे व ह्यावर्षी आर्थिक परिस्थिति कशी काय राहील याबद्दल कांहीं अनुमानें काढणें शक्य झालें आहे. अन्नधान्याच्या आयातीसाठीं चालू वर्षी रु. १०० कोटी खर्ची पडतील व चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांचे पर-राष्ट्रिय व्यापाराचे प्रसिद्ध झालेले आंकडे सुमारें १८ कोटी रुपयांची प्रतिकूल तफावत दर्शवितात. साखरेच्या धंद्याला संरक्षण देण्याच्या प्रश्नाचा टॅरिफ बोर्ड विचार करीत आहे व सध्याची परिस्थिति अशी दिसते कीं, परदेशांतील स्वस्त साखर आयात करणें कदाचित् गिऱ्हाइक वर्गाच्या दृष्टीनें फायदेशीर ठरेल. कारण साखर कार-खानदारांना साखरेचे भाव कमी करणें एकंदर परिस्थितीच्या दृष्टीनें परवडत नाहीं. भाव कमी केल्यास त्याचा परिणाम पर्यायानें उसाच्या शेतकरी वर्गाला सहन करावा लागेल व भांडवल गुंतवणुकीच्या दृष्टीनेंहि साखरेचे भाव कमी केले असतां डिव्हिडंड-वर व पर्यायानें साखर कंपन्यांच्या शेअर्सवर परिणाम होईल. रहाणीचे निर्देशक आंकडे डिसेंबर महिन्यांत साधारण स्थिर पातळीवर राहिले. परंतु एकंदर उत्पादनाच्या दृष्टीनें विचार केला असतां शेती व औद्योगिक उत्पादन ह्यांत वाढ झाल्याचें आढळत नाहीं. भावी औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें भांडवल-संचयाचें प्रमाण कांहींसें तरी वाढलें पाहिजे. तसें तें वाढत आहे असें वाटत नाहीं. दरवर्षी सुमारें रु. ५०० कोटी इतकें उत्पन्न शिल्लक राहून तें जर उद्योगधंद्यांत गुंतविलें गेलें तरच परिस्थिति निश्चितपणें सुधारेल. परंतु अजूनहि औद्योगिक भांडवल जोरदार रीतीनें आकर्षिलें जाण्याची दिसावीं तितकीं चिन्हें स्पष्ट दिसत नाहींत.

अर्थमंत्री ह्यांनीं एका सुप्रसिद्ध भाषणांत, वस्तूंचे बाजारभाव आज आहेत त्या पातळीवर स्थिर राखण्याचें सरकारी धोरण राहील, असें आश्वासन दिलें. हें आश्वासन फारसें आशा-जनक नसलें तरी भावी संकटापासून आपलें संरक्षण करावयास पुरेसें आहे असें वाटतें. कारण वस्तूंचे बाजारभाव डिसेंबर महिन्यांत जवळ जवळ स्थिर होते तसेच ते राहीले तर महागाई निदान वाढ-णार तरी नाहीं. महागाई वाढली नाहीं म्हणजे निरनिराळ्या ठिकाणीं ऐकूं येणारी संपाची भाषा प्रत्यक्ष कृतींत उतरविणें कठीण जाईल. आज परिस्थिति अशी आहे कीं, बाजारभावांची धारणा स्थिर राहून संप केले गेले नाहींत व निरनिराळ्या प्रकारच्या उत्पादनाला सर्वांनीं मदत केली तर संपत्तीचें एकंदर उत्पादन वाढून आर्थिक परिस्थिति निदान स्थिर राहील व जास्त बिघडणार नाहीं. अशा रीतीनें आर्थिक परिस्थिति स्थिर राखण्यांतहि आपण कांहींतरी विधायक कार्य साध्य करीत आहोंत असें होईल. कांहीं काळपर्यंत परिस्थिति स्थिर राहिल्यावर नंतर उत्पादन वाढून वस्तूंचे भाव कदाचित् कमी होऊं शकतील. याच वेळीं ओपन जनरल लायसेन्सचे निर्बंध सैल केल्यामुळें स्वस्त परदेशी माल आयात होत आहे. हा आयात होणारा मालहि गिऱ्हाइकाची क्रय-शक्ति योग्य मार्गाकडे वळवावयास लावून महागाईची तीव्रता कमी करण्यास कदाचित् मदत करील. ह्याच वेळीं इतर देशांकडे शक्यतो खपणारा जास्त माल आपण पाठवूं शकल्यास चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत दिसून आलेली प्रतिकूल तफावतहि थोडी-फार भरून निघण्यास मदत होईल. सारांश, १९४९ सालांत पदार्पण करतांना हिंदची आर्थिक परिस्थिति फारशी समाधानकारक नसली तरी ती निराशाजनक तरी नाहीं व कदाचित् ती अल्पांशानें सुधारूंहि शकेल असें म्हणावयास हरकत नाहीं.

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

आज जास्तीत जास्त उत्पादनाची निकड असतानाही या अनिश्चिततेच्या काळांत कांहीं न केलेलें बरें, असें म्हणून साशंक मनानें कारखानदार स्वस्थ बसले असल्याचा उल्लेख ग. ज. राजगोपालचारी यांनीं कलकत्त्यांतील आपल्या एका भाषणांत केला.

भांडवल–उभारणीबाबतची सध्याची प्रतिकूल परिस्थिति, माल मिळण्याच्या व वहातुकीच्या अडचणी, कामगारांची कामांत अळंटळम् करण्याची नि प्रसंगीं अडवणुकीची प्रवृत्ति, यांची मला जाणीव आहे. सरकारचें उद्योग धंद्याबाबतचें धोरण निश्चित नसेल; तथापि तें सहानुभूतीचें असणार यांत मला तरी संदेह वाटत नाहीं.

ब्रिटिश अमदानींत कठोर विरोध असतानाही आम्ही कारखाने काढले, टिकविले, वाढविले. या भट्टींतून तावून–सुलाखून निघाले-ल्या आमच्या हिंदी कारखानदारांनीं स्वराज्यांत हात जोडून स्वस्थ कां बसावें ? विरोधांतून चेतावलेली देशप्रेमाची ज्योत स्वातंत्र्या-च्या फुंकरानें विझली तर नाहीं ना ?

कीं युद्धकाळांतील नफेबाजी नि विशेष काम न करतां वाढ-लेले पगार यांचें स्वास्थ्य, महागाईच्या चढत्या भांजणीवर पोसलेला विषाद नि असहाय्यता आमच्या कार्यप्रविणतेच्या आड येत आहेत ?

निश्चितता म्हणजे तरी काय ?

जसं काल–परवां होतं तसं आज–उद्यां ? बदल, प्रगति नको ? गेल्या दहा वर्षांत सारें जीवन ढवळून गेलें आहे. हिंदुस्थानां-तील शहरें, कारखाने, कलाकृति सर्व कांहीं सुरक्षित–शाबूत आहे; पण समाजजीवनांत व मानस–सृष्टींत नवीन जिवंत प्रवाह झपाट्यानें वाढत असून त्यांची दखलगिरी आम्हीं वेळींच घ्यावी हें बरं.

माझे एक तरूण स्नेही इंग्लंडहून नुकतेच परत आले. जर्मनीं-तही कांहीं दिवस होते. इंग्लिश माणूस पुराणप्रिय खरा, पण बदलत्या काळाच्या पावलांची चाहूल घेऊन वागणारा व्यवहारी आहे. मजूर सरकारच्या नेतृत्त्वाखालीं भांडवलशाहीचें पूर्वीचें रूप पार पालटून टाकण्यांत आलें असून नव–युगास साजेशी व्यवस्था करण्याच्या त्याच्या प्रयत्नांत सर्वजण सहकार्य करीत आहेत. अन् म्हणूनच युद्ध समाप्तीनंतरच्या बिकट काळांतून ब्रिटन सहीसलामत सुटण्याच्या वाटेवर आहे !

जर्मनींतील एका यंत्रसामग्री बनविणाऱ्या मोठ्या कारखान्यांत गेले असतांना माझ्या स्नेह्यांना सांगण्यांत आलें कीं, त्या कारखान्यांत कांहीं यंत्रें चारएक वर्षांहून अधिक वापरीत नाहींत ! तीं टाकून देऊन दुसरीं नवीं यंत्रें आणतात. अद्यावत् राहून स्वस्त माल देण्याची खटपट व उत्तम माल बनवून त्याचा दर्जा कायम राखण्याचा–वाढविण्याचा खटाटोप यांतच जर्मन कारखानदारांचें यशाचें मर्म असावें.

यापुढील दिवसांत यशस्वी व्हावयाचें तर आपल्या कारखान-दारांच्या कल्पनेंत–व्यवस्थेंत बदल होणें अपरिहार्य आहे असें दिसतें.

अनुभव मोलाचा खरा, त्याबरोबरच कालौघ जाणण्याची मनाची व कृति करण्याची स्वतःची तयारी हवी. 'जैसे थे' ऐवजी गतिमानता हाच यशस्वी उद्योगाचा स्थायीभाव होय हें जाणण्याची आवश्यकता आजच्याइतकी पूर्वी कधींच नव्हती !

—संजय

चुकीची दुरुस्ती*

## ताळेबंदावर सही करण्यास मॅ. एजंटांचा नकार

स. न. वि. वि.

ता. २९ डिसेंबरच्या "अर्थ"च्या अंकांत वरील मजकुरामध्यें इंडिया युनायटेड कंपनीचा उल्लेख आहे. वास्तविक तो मजकूर सोलापूर स्पि. आणि वी. मिल्स लि. बद्दल आहे. त्यांचेबद्दल मॅ. एजंटस व शेअरहोल्डर्समध्यें बरीच भांडाभांड आहे. परंतु शेअर्सची मताची विभागणी अशी आहे कीं, शेअरहोल्डर्सना कांहीं एक करणें शक्य नाहीं.

विलेपार्लें, मुंबई २४. ग. कृ. चितळे

*श्री. चितळे ह्यांच्या वरील दुरुस्तीबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. मॅ. एजंटस व भागीदार ह्यांचेमधलि तीव्र मतभेदामुळें कंपनीची ता. ३० रोजीं भरलेली ७३ वी वार्षिक सभा पुढें ढकलण्यांत आली.

सं. 'अर्थ'

---

## २० कोटी रु. चे रोखे रद्दी कागदाचीं चिठोरीं बनलीं

हैद्राबाद सरकारच्या नांवावर कित्येक कोटी रुपयांचे हिंद सरकारचे रोखे आहेत. त्यांपैकीं २० कोटी रुपयांचे रोखे हैद्राबाद सरकारच्या अधिकाऱ्यांनीं एका वर्षापूर्वीं पाकिस्तान सरकारच्या नांवानें करून टाकले. हैद्राबाद सरकारला परराष्ट्रांशीं परस्पर व्यवहार करण्याचा, हिंद–हैद्राबाद 'जैसे थे' कराराप्रमाणें, अधिकारच नव्हता. निजामानें नुकतेंच जाहीर केलें कीं हा व्यवहार अनधिकृत होता. हैद्राबाद सरकारनें पाकिस्तान सरकारला लिहून हे रोखे परत मागितले. परंतु ते त्या सरकारनें देण्याचें नाकारलें. तेव्हां हे रोखे पुनः योग्य त्या मालकास म्हणजे हैद्राबाद सरकारास मिळवून देणें हिंदुस्थान सरकारास क्रमप्राप्त झालें. २० कोटी रुपयांचे पहिले रोखे रद्द करून त्यांच्या जागीं दुसरे रोखे हैद्राबाद सरकारास देण्याचा अधिकार आतां रिझर्व्ह बँकेस एका ऑर्डिनन्स अन्वयें देण्यांत आला आहे. ह्याचा अर्थ, पाकिस्तान सरकारजवळील २० कोटींचे रोखे हीं रद्दी कागदाचीं चिठोरीं बनलीं आहेत.

## सांगली बँकेच्या मॅनेजरांच्या सेवेचें चीज

बँक ऑफ सांगली, लि. चे मॅनेजर श्री. पु. श्री. मोकाशी, ह्यांनीं नुकताच आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. ते सुमारें १० वर्षें सांगली बँकेचे मॅनेजर होते व त्यांनीं बँकेची चांगली प्रगति घडवून आणली. श्री. मोकाशी ह्यांनीं केलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांना बँकेच्या साधारण सभेनें १५ हजार रुपयांचें बक्षीस मंजूर केलें आहे. बँकेच्या भागीदारांनीं श्री. मोकाशी ह्यांना ही देणगी देऊन इतर बँकांना उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे.

## तलम कापड हवें, तर ज्यास्त किंमत द्या

हिंदी गिरण्यांत तयार होणाऱ्या तलम (सुपरफाइन) कापडावर हिंदुस्थान सरकारनें २५% जकात बसविली आहे. ह्या जकातीमुळें तलम कापड महाग होऊन तें कमी खपेल व त्यामुळें गिरण्यांना जाडेंभरडें कापड ज्यास्त काढणें भाग पडेल अशी सरकारची अपेक्षा आहे. जकातीचें उत्पन्न ५ ते ८ कोटी रुपये होईल. ४८ s वरील ताण्याचें कापड सुपरफाइन समजलें जाईल.

---

**बिहारमध्यें नूतन वर्षदिनाची सुट्टी नाहीं**—बिहार सरकारच्या कचेऱ्यांस व त्या प्रांतांतील बँकांस १ जानेवारी रोजीं सुट्टी नव्हती. सर्व व्यवहार इतर दिवसांप्रमाणें चालू होते.

**रिझर्व्ह बँकेवर सरकारची मालकी**—१ जानेवारी, १९४९ रोजीं हिंदी रिझर्व्ह बँक सरकारी मालकीची झाली. भागीदारांना ३% १९७०–७५ चे रोखे मिळणार आहेत.


## मागोरा केमिकल कं. लि.
## पुणें २.

कंपनी सध्या टिंक्चर्स, इंजेक्शन्स, पेटंट औषधें, कीटक नाशकें व सौन्दर्य प्रसाधनें इ. माल तयार करीत असून त्याचा खपही दिवसेंदिवस वाढत आहे. नवीन कांहीं खातीं चालू करावयाचीं असलेमुळें ठराविक रकमेपर्यंतच कांहीं ठेवी स्वीकारावयाच्या आहेत.

मुदत :— १, २ व ३ वर्षें
व्याजाचा दर:— ५, ५½ व ६ टक्के

कंपनीनें यंदा प्रेफरन्स शेअर्सवर ५ टक्के व ऑर्डिनरी शेअर्सवर ३ टक्के डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

अधिक माहितीसाठीं लिहा:—

रा. य. रानडे, बी. ए.
मॅनेजिंग एजंट







## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

जयपूर काँग्रेस

## काँग्रेस आणि अर्थकारण

ऑगस्ट १५, १९४७ पूर्वी हिंदी राष्ट्रीय सभा स्वराज्याच्या जन्मसिद्ध हक्काकरितां झगडणाऱ्या हिंदी जनतेची प्रमुख शक्ति होती. स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर काँग्रेसचें पहिलें राष्ट्रीय सरकार अधिकारारूढ होऊन सरकार–विरोधी संस्था सरकारच बनली. या क्रमप्राप्त बदलाचे निनाद जयपूरच्या अधिवेशनांत उमटल्याखेरीज कसे राहतील ?

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनीं म्हटल्याप्रमाणें, या काँग्रेस अधिवेशनांत संमत झालेले प्रस्ताव महत्त्वाचे असून त्यानुसार परिस्थितीप्रमाणें सरकारी धोरण राहील.'

स्वातंत्र्याच्या चळवळींचें स्वरूप राजकीय असलें तरी स्वराज्याचा अंतिम हेतू आर्थिक, सामाजिक आणि नैतिक मूल्यांचें प्रत्यक्ष दर्शन हाच होय.

या विविध प्रश्नांची दखल काँग्रेस अधिवेशनांत तशीच त्यावेळीं गांधी नगरांत भरलेल्या किसान सभा, हिंदुस्थान मजूर सेवक संघ, सर्वोदय प्रदर्शन, यांच्या सभांत घेण्यांत आली.

### स्वातंत्र्य मिळालें: त्यानंतर

"राजकीय स्वातंत्र्य मिळालें. आतां सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवावयाचें राहिलें. जन्म-जात-धर्म-पैसा यामुळें आलेला विग्रह नाहींसा करून वर्गविरहित जनताभिमुख समाज आणि आर्थिक पद्धति निर्माण करण्याचें महात्माजींचें अपुरें राहिलेलें कार्य करावयाचें आहे." 'संदेश' प्रस्ताव.

### आजची आर्थिक परिस्थिति

"आज देशावर आर्थिक अरिष्ट आलें आहे. अत्यंत नेकीनें राहिलें पाहिजे. फाजील खर्च करूं नये. उत्पादन घटत आहे. किंमती वर वर चढत आहेत. उत्पादन वाढविण्याकरितां देशांतील सर्व शक्ति एकवटल्या पाहिजेत. शिल्लक रक्कम सरकारी रोख्यांत व सरकारप्रणीत प्रयत्नांत गुंतवावी. सरकारी खर्चांत कपातीची कात्री फिरली पाहिजे.

आजच्या जिकीरीच्या, कष्टमय जीवनाची जाणीव काँग्रेसला आहे. उभय पक्षांत समेट-समझोता घडवून आणण्याबाबत हल्लीं असलेली व्यवस्था दोषयुक्त आहे याची कल्पना आहे. बदलाची आवश्यकता मान्य आहे."—आर्थिक कार्यक्रम प्रस्ताव.

हिंदुस्थानांतील कम्युनिस्टांचे 'मोड–तोड' मार्ग पंडीत नेहरूंना पसंत नाहींत.

कामगारांच्या बऱ्याकरितां जर कम्युनिस्ट व समाजवादी काम करीत असते तर त्यांचें आमचें भांडण नाहीं असें सांगून सरदार पटेल पुढें म्हणतातः–" आपण सावध असलें पाहिजे, नाहींतर आशियांत इतरत्र भडकलेल्या आगीची झळ आपल्याला लागल्याखेरीज राहणार नाहीं. परदेशी प्रबळ शक्तीची तत्त्वप्रणाली कम्युनिस्ट आपल्यामध्यें पसरवीत आहेत."

समाजवादी पक्षाचीं तत्त्वें व उद्देश आपल्याला मान्य असल्याचें पंडीतजींनीं सांगितलें. तथापि त्यांचे मार्ग चांगले व युक्त नसल्याचेंही त्यांनीं स्पष्ट केलें.

स्वतःकरितां राजकीय सत्ता मिळविण्याच्या हेतूनें समाजवादी मंडळी कामगारांना हाताशीं धरीत आहेत असा दावा सरदारांनीं मांडला.

आजच्या आर्थिक परिस्थितीबाबत अध्यक्ष डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांनीं मूलग्राही विचार मांडले आहेत. आर्थिक स्थिती सुधारण्याचे आड वाढत असलेल्या किंमती—महागाई येत आहे. किंमती आणि पगार यांचा पाठशिवणीचा खेळ चालूं असल्यानें परिस्थिति बिकट होत आहे. किंमती किती असाव्यात याबाबत जोंपर्यंत निश्चित विचार वा धोरण नाहीं, सरकार–भांडवलदार–कामगार यांचे परस्पर आर्थिक संबंध समाधानकारक रीतीनें ठरलेले नाहींत, तोंपर्यंत आजच्या आर्थिक प्रश्नाचें शाश्वत उत्तर सांपडणार नाहीं. हें मूलभूत प्रश्न जरी मध्यवर्ति सरकारनें हाताळावयाचे असले तरी जेवढें प्रांतिक सरकारांचे हातांत आहे तेवढें तरी त्यांनीं तात्बडतोब करावें अशी अध्यक्षांनीं सूचना केली आहे.

### उत्पादन

हिंदुस्थानांतील प्रत्येक माणसाला खावयाला पुरेसें अन्न आणि नेसायला भरपूर वस्त्र–कापड मिळालें पाहिजे. हा आजचा मुख्य प्रश्न आहे. कोट्यवधि माणसें जर अर्धपोटी असतील तर शांतता टिकणार नाहीं. स्वराज्याला कांहीं अर्थ राहाणार नाहीं. आज कोट्यवधि रुपयांनीं परदेशी अन्नधान्याची आयात चालली आहे. हें असेंच आणखी कांहीं वर्षे चाललें तर थोड्याच दिवसांत आपल्याला दिवाळें काढावयाची वेळ येईल. अशा परिस्थितींत उत्पादन कार्यास हातभार लावणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे— सरदार पटेल.

"अन्न आणि इतर नित्योपयोगी वस्तूंबाबत स्वयंपूर्ण होण्याचे दृष्टीनें धरणें वगैरेंच्या मोठमोठ्या योजना पुऱ्या केल्या पाहिजेत. त्याबरोबरच छोटेखानी कामेंही हातीं घेतलीं पाहिजेत. उत्पादनांत तात्बडतोब वाढ असें केल्यानें होईल. हें सर्व नियोजनपूर्वक केलें पाहिजे. लहान व खेडेगांवीं धंदे सहकारी पद्धतीनें चालवून उत्पादनाचें विकेंद्रीकरण करावें. आर्थिक योजनेंत या कार्यक्रमास कायमचें स्थान असावें.

शेतकरी व त्याच्या कुटुंबाकरितां लागणारें धान्य ठेवून त्याला योग्य व शहरी कामगार आणि सरकारी नोकरवर्गाला परवडेल अशा दरानें धान्य खरेदी व्हावी. किसानांनीं याबाबत सरकारशीं सहकार्य करावें.

खेडुतांना नियंत्रित दरांत गिरणीचें कापड पुरेसें मिळण्याची व्यवस्था प्रांतिक सरकारांनीं करावी. कापडविषयक मध्यवर्ति सरकारचें धोरण काँग्रेसला संमत आहे.

उत्पादन वाढवावयाचें तर मालक–मजूर झगडे टाळले पाहिजेत.

कामगारांकरितां पुरेशीं घरें तावडतोब बांधून देण्याची विनंति मध्यवर्ति व प्रांतिक सरकारांना करण्यांत येत आहे.

हिंदुस्थान सरकारनें आपलें औद्योगिक धोरण जाहीर केलें आहे. त्यांत खाजगी धंद्यांना भरपूर अवसर ठेवलेला आहे. राष्ट्रहितानुसार उद्योगधंदे चालले पाहिजेत. फक्त महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें क्रमशः राष्ट्रीयीकरण करावयाचें असलें तरी कारखानदारांच्या योग्य हितसंबंधांना धक्का लावण्याचा विचार नाहीं. आपली नफेबाजी कमी करून कारखानदारांनीं उत्पादन वाढविलें पाहिजे. आजच्या बिकट परिस्थितींत उद्योगपतींनीं देशाबाबतचें आपलें कर्तव्य केलेंच पाहिज."–'आर्थिक कार्यक्रम' प्रस्ताव.

देशांत आर्थिक घडी बसविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांत असतांना उद्योगपतींनीं जनतेशीं सहकार केला नाहीं. ते जर असेच वागतील तर त्यांचे विरुद्ध उसळणारी लाट थांबविणें कठीण होईल, असा इशारा श्री. रंगा यांनीं वरील ठरावावर बोलतांना दिला. तसेंच उत्पादन वाढविण्याच्या सरकारच्या प्रयत्नांत त्याला सहकार्य देण्याची कामगारांना विनंति केली. ( अपूर्ण )

—संजय

## कामगारास काढण्याचा अनिर्बंध हक्क मालकास नाहीं.

### संयुक्त-प्रांतांतील औद्योगिक ट्रायब्यूनलाचा निवाडा

एखाद्या कामगाराला योग्य ती नोटीस देऊन किंवा नोटीसीच्या मुदतीचा पगार देऊन तडकाफडकीं काढून टाकण्याचा अनिर्बंध हक्क मालकास नाहीं. त्यासाठीं योग्य व न्याय्य असें कारण असलें पाहिजे, असा निवाडा संयुक्त प्रांतांतील एका औद्योगिक कोर्टानें दिला आहे. औद्योगिक कोर्टापुढील खटल्याची हकीकत पुढील प्रमाणें आहे.

खटल्यांत नौकराला कामावरून कमी करण्याचें कारण असें सांगण्यांत आलें कीं, तो नौकर घेतलेली कर्जे परत करीत नसे व घराचें भाडें देत नसे. मालकाचें म्हणणें असें होतें कीं, कंपनीच्या स्टँडिंग ऑर्डरप्रमाणें कोणालाही एका महिन्याची नोटीस देऊन अगर त्या मुदतीचा पगार देऊन कांहींही कारण न देतां काढण्याचें स्वातंत्र्य मालकाला आहे. परंतु औद्योगिक कोर्टानें मालकाचा मुद्दा अग्राह्य धरून काढलेल्या नौकराला कामावर परत घेण्यांत यावें, ज्या मुदतींत तो कामाविना होता त्या मुदतींत त्यानें जितके पैसे मिळविले असतील त्याच्या २५ टक्के रक्कम त्याला देण्यांत यावी आणि कायम नौकरीच्या इतर सवलती त्याला पूर्वीप्रमाणेंच मिळाव्या असा निर्णय दिला. ह्याच कंपनीच्या बाबतींत दुसरा एक खटला औद्योगिक कोर्टापुढें आला होता. ह्या प्रकरणांतहि कंपनीनें एका नौकराला एकदम कामावरून काढून टाकलें होतें. ज्या नौकराला कामावरून दूर करण्यांत आलें होतें त्याला औद्योगिक कोर्टानेंच कांहीं कारणावरून ५ रुपये दंडाची शिक्षा केलेली होती. कंपनीतर्फे अशी बाजू मांडण्यांत आली कीं, ह्या नौकराविरुद्ध इतरही पुष्कळ तक्रारी होत्या. पण त्या सिद्ध करणें अवघड होतें. अशा कामगाराला नौकरीवर ठेवून कंपनीची इभ्रत कमी करणें योग्य नसल्यामुळें कंपनीनें त्या इसमाला बडतर्फ केलें. औद्योगिक कोर्टानें ही बडतर्फी अयोग्य ठरविली. पूर्वीच्या गैरवर्तणुकीबद्दल कोर्टानें त्याला पांच रुपये दंड केला होताच. त्यापेक्षां अधिक शिक्षा म्हणून कामावरून काढून टाकणें वाजवी होणार नाहीं असें कोर्टाचें मत झालें. अर्थातच त्या कामगाराला परत कामावर घेण्याचा आणि कामावर नसलेल्या मुदतीच्या ५० टक्के पगार देण्याचा हुकूम कोर्टानें केला. ही कंपनी सार्वजनिक उपयुक्ततेची आहे. कंपनीच्या कामगारांचा एक संघ आहे. संघाच्या अधिकाऱ्यांनीं कंपनीवर रीतसर संपाची नोटीस बजाविली. त्याबरोबर तीन दिवसांच्या आंतच कामगार-संघाच्या चारही अधिकाऱ्यांना कामावरून दूर करण्यांत आलें. हे अधिकारी ज्या जागांवर काम करीत होते त्या जागाच रद्द करण्यांत आल्या असें कारण दाखविण्यांत आलें.

कंपनीतर्फे कैफियत मांडण्यांत आली ती अशीः-कंपनीला पुरेसा फायदा होत नव्हता, खर्चातही वाढ झाली होती आणि शिवाय वरील चार जागा अनावश्यक अशा होत्या. कामगार संघानें उलट असें सांगितलें कीं, कंपनीनें आपले हिशेब दाखवून, वरील कामगारांना कमी केल्यानें बचत कशी झाली तें सिद्ध करावें. कंपनीनें पूर्वीच्या मॅनेजरच्या ऐवजीं नवा मॅनेजर नेमून त्याला १,२०० रु. पगार दिला. पहिल्या मॅनेजरला ७५० रुपये पगार मिळत असे. ह्याशिवाय इतर नवीं नेमलेलीं माणसें लक्षांत घेतां कंपनीचा पगारापायीं खर्च मासिक ३,००० रुपयांनीं वाढला होता. उलटपक्षीं ज्या कामगारांना कामावरून काढण्यांत आलें होतें, त्यांना प्रत्येकीं पगार अवघा १२० रुपये होता. ह्या कामगारांना कमी केल्यानें कंपनीचा खर्च बराच कमी झाला हें म्हणणें कंपनीला सिद्ध करतां आलें नाहीं. नवीन मॅनेजरला थोडा अधिक पगार दिला असला तरी त्यानें कारखान्यांत सुधारणा करून हजारों रुपये वांचविले होते असा युक्तिवाद मात्र कंपनीतर्फे करण्यांत आला. औद्योगिक कोर्टानें कंपनीचें म्हणणें उलट तिच्याच गळयांत घातलें. कोर्टाचें म्हणणें असें पडलें कीं, नवीन मॅनेजरनें हजारों रुपये वाचविले त्याअर्थी कंपनीची परिस्थिति सुधारली; अर्थातच् कमी केलेल्या कामगारांच्या पगाराची बचत कंपनीच्या हिशेबी कांहीं मोठी बाब होऊं शकत नाहीं. दुसरें असें कीं, संपाची नोटीस दिल्यापासून तीन दिवसांच्या आंत संघाच्या अधिकाऱ्यांना काढण्यांत आलें. ह्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

कोर्टानें असा निर्णय दिला कीं, वरील कामगारांना कामावरून काढणें योग्य होणार नाहीं. कंपनीनें त्यांना पहिल्याच पगारावर १५ दिवसांच्या आंत कामावर घ्यावें. बडतर्फ कामगारांपैकीं ज्या दोघांनीं कामावरून काढण्याच्या वेळीं झाल्या दिवसांचा पगार घेतला होता त्यांना महिन्याचा पगार देण्यांत यावा आणि ज्या एकानें घेतला नव्हता त्याला दोन महिन्यांचा पगार नुकसानभरपाई दाखल देण्यांत यावा. चौथा कामगार आपखुषीनें पाकिस्तानांत गेला होता, त्याचा प्रश्नच नव्हता.

---

### विमानवहातुक कंपन्यांपुढील प्रश्न

वैमानिक वहातुकीच्या हिंदी कंपन्यांपैकीं बहुतेक कंपन्यांनीं १९४७ सालीं आपल्या हिशेबांत तोटा दाखविला आहे. त्या सर्वांच्या तोट्याची बेरीज ६० लक्ष रुपयांवर जाईल. जेथें चार किंवा पांच कंपन्यांपुरतेंच काम आहे, अशा ठिकाणीं नऊ कंपन्यांना विमान वहातुकीचा परवाना देण्यांत आला आहे आणि त्यांचेजवळ फक्त ११० च विमानें आहेत. खर्चाचें प्रमाण वाढलें असल्यामुळें, वहातुकीचे दर वाढवून मिळावेत अशी कंपन्यांनीं सरकारकडे विनंति केली आहे. कित्येक कंपन्यांनीं युद्धसमाप्तीनंतर उरलेल्या 'डकोटा' विमानांची खरेदी केली; तीं विमानें दोन-तीन वर्षांनीं बदलावीं लागतील. त्यांच्या खरेदीच्या किंमतीच्या प्रमाणांत जरी घसारा फंड काढण्यांत आले, तरी ते आतां महाग झालेल्या विमानांचे खरेदीस कसे पुरणार, हा महत्त्वाचा प्रश्न कंपन्यांच्या पुढें आहे. किर्लोस्कर बंधू लि. चे अध्यक्ष, श्री. सरदार जगन्नाथ महाराज, ह्यांनीं कंपनीच्या वार्षिक सभेंतील आपल्या भाषणांत ह्या घसाऱ्याच्या तरतुदीच्या प्रश्नाचा उल्लेख केला होता, हें वाचकांस स्मरत असेलच. यंत्रसामुग्रीच्या वाढत्या किंमतींचे परिणाम सर्वच कंपन्यांना जाणवत आहेत.

---

### पेटंट चौकशी समितीची प्रश्नपत्रिका

पेटंट-विषयक कायदा हिंदुस्थानांत १८५८ पासून अस्तित्वांत आहे. या जुन्या कायद्यांत हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें सुधारणा व्हावी अशी कारखानदारांची व संशोधकांची जुनी मागणी होती. तिला मान देऊन हिंदुस्थान सरकारनें एक चौकशी समिति नियुक्त केली आहे. या समितीनें चौकशी कोणत्या मुद्यांसंबंधीं करावयाची त्याचें पत्रक व समितीची प्रश्नपत्रिका प्रसिद्ध झाली आहे. वरील पत्रक व प्रश्नपत्रिका सर्वांना पाहण्याकरितां व त्यासंबंधीं सूचना करण्याकरितां फुले-मंडईवरील लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयांत ठेविलेली आहे. ती कोणासहि कोणत्याहि दिवशीं ( रविवारींसुद्धां ) सकाळीं ९ ते सायंकाळीं ५ पर्यंत पहावयास मिळेल. कारखानदार, व्यापारी, संशोधक ह्यांनीं व इतरांनीं त्याचा अवश्य फायदा घ्यावा.

—x—

## पर-प्रांतांतील बातम्या

**कलकत्त्याला बेसुमार गर्दी**—प. बंगाल सरकारच्या आंकडेशास्त्रीय संस्थेनें कलकत्ता शहराची लोकवस्तीच्या दृष्टीनें पहाणी केली. त्यांत एक गोष्ट विशेष लक्षांत आली कीं, सामान्यपणें गलिच्छ वस्तीच्या भागांपेक्षां इतर भागांतच लोकांची वस्ती अधिक दाट आहे. कलकत्याच्या मध्यमवर्गीय लोकांपैकीं बहुतेक लोक तीन खोल्यांच्या बिऱ्हाडांतून सध्यां रहात आहेत. एका खोलींत साधारणपणें ३·८७ लोक रहातात असें प्रमाण पडतें. पक्क्या इमारतींत रहाणाऱ्या कुटुंबांपैकीं ६९·५ टक्के लोक रहाण्याच्या जागेच्या दृष्टीनें गलिच्छ वस्तींतील लोकांपेक्षांही अधिक वाईट स्थितींत आहेत.

**कलकत्याचा चहाचा बाजार**—कलकत्ता शहराला चहाच्या व्यापाराच्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून देण्यासाठी हिंदुस्थान सरकार एका योजनेचा विचार करीत आहे. चहावरील कमिशनच्या धंद्यांत हिंदी प्रतिनिधींना वाव देण्याचीही खटपट सरकार करीत आहे. सध्यां हिंदुस्थानांतील चहाचा जवळ जवळ सर्व व्यापार हिंदेतर लोकांच्या ताब्यांत आहे. हिंदी चहाचे लिलाव लंडनमध्यें होतात. हिंदुस्थानांत जगांतील सर्वांत अधिक चहा निर्माण होतो.

**माकडांची निर्यात**—हिंदुस्थाननें अमेरिकेशीं करार करून १६ हजार माकडें अमेरिकेला निर्यात करण्याचें कबूल केलें आहे. इनफन्टाइल पॅरॅलिसिस ह्या रोगासंबंधीं प्रयोग करण्यासाठीं ह्या माकडांचा उपयोग करण्यांत येणार आहे. माकडें संयुक्त प्रांतांतून पाठविलीं जाणार असून त्यांचा प्रवास विमानानें होणार आहे.

**वृत्तपत्रांच्या कागदाचा पहिला कारखाना**—नॅशनल न्यूजप्रिंट अँड पेपर मिल्स ह्या वृत्तपत्राचा कागद तयार करणाऱ्या कारखान्याचा कोनशिला-समारंभ मध्यप्रांताचे पंतप्रधान पं. शुक्ल ह्यांच्या हस्तें नुकताच झाला. कारखाना चांदणी येथें उभारण्यांत येत आहे. प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात १९४९ अखेर होईल; दररोज १०० टन कागद तयार होईल असा अंदाज आहे. वृत्तपत्राच्या कागदाचा हा हिंदुस्थानांतील पहिलाच कारखाना आहे.

**कोळ्यांसाठी संशोधन केंद्र**—मद्रास सरकारनें कोळ्यांसंबंधीं संशोधन करण्यासाठी प्रांतांत एक केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. संशोधन केंद्रासाठी १,८८,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

**इंदूरचे रस्ते सुधारणार**—इंदूर शहरांतील अधिक वाहतुकीचे रस्ते डांबराचे आणि सिमेंटचे करण्यासाठी इंदूर नगरपालिकेनें ५ वर्षांत १५ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय रस्त्यावरील गटारेंही सुधारण्याचें काम करण्यांत येणार आहे.

**मद्रासमधील विजेच्या कंपन्या**—मद्रास प्रांतांतील शहरें आणि खेडीं ह्यांना विजेचा पुरवठा योग्य प्रमाणांत करतां यावा म्हणून मद्रास सरकारनें प्रांतांतील विजेच्या कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविलें आहे. त्यासाठी कराव्या लागणाऱ्या कायद्याचा मसुदा तयार करून तो मध्यवर्ती सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आला आहे.

**शिंद्या कंपनीची तिसरी बोट**—विझगापट्टम् (गांधी ग्राम) येथील बोटी बांधण्याच्या आपल्या गोदींत शिंद्या स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें आपली तिसरी बोट 'कुतुबतारी' नुकतीच बांधून पुरी केली. ह्या बोटीचा जलवितरण समारंभ गोदीच्या मॅनेजरच्या हस्तें करण्यांत आला.


दि

# बँक ऑफ इंडिया, लि.

स्थापना १९०६

खपलेलें भांडवल :— ३,९६,९१,९००.
वसूल झालेलें भांडवल :— १,९८,४५,९५०.
राखीव फंड :— २,४८,४५,९५०.

मुख्य कचेरी :—ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :— मुंबई :— बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीक :—वांद्रें व अंधेरी. अहमदाबाद :—भद्र (मुख्य शाखा), गांधी रोड, इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :—क्लाइव्ह स्ट्रीट (मुख्य शाखा), बडा बाजार व चौरंघी स्केअर. नागपूर :—किंग्ज वे व इतवारी बाजार. पुणें :—लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :— १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :—सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी.

चालू ठेवींचें खातें :—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटींवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्युटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें



# कूळ कायदा

आवृत्ति ३ री एका वर्षांत प्रसिद्ध झाली. किं. ३ रु.

| | |
|---|---|
| मुंबई सावकारी कायदा | किं. २॥ रु. |
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. २ रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा | कापडी किं. ४॥ रु. / कागदी किं. ४ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनी तयार केलीं आहेत.

पत्ता—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.



हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजिनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.